संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# विचारांचा तेजोभास्कर डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. बाबासाहेब** आंबेडकरांनी राज्य पुनर्रचना आयोगाला आपला अहवाल सादर करताना त्याच्या प्रस्तावनेमध्ये काही विचारवंतांची वाक्ये व्यक्त केली होती. त्यात त्यांनी कोणतीही विचार प्रणाली विशिष्ट कारणांमुळे आकाराला येते. त्यांचे असे म्हणणे होते की विचारप्रवाहाला मर्यादा नसतात. किंबहुना काळानुसार विचारांमध्येसुध्दा परिवर्तन होत राहिले पाहिजे. ज्या दृष्टीकोनातून बाबासाहेबांचे लिखाण किंवा त्यांनी उभारलेली चळवळ याचा जर अभ्यास केला तर त्यांचे व्यक्तिमत्व आणि विचारसुध्दा हे गतीमान स्वरुपाचे होते असे लक्षात येते. म्हणूनच आज शंभर वर्षानंतरही त्यांच्या विचारांची शिदोरी काळानुसार अनेकांना प्रेरणा देणारी ठरली आहे. प्रत्येक महापुरुषाच्या तत्वज्ञानाचा किंवा जीवनाचा अभ्यास ही खरे तर अनुयायांची आणि अभ्यासकांचीच कसोटी असते. कारण त्यांनी मांडलेल्या संकल्पना, मूल्ये किंवा तत्वप्रणाली या तशाच कायम राहू नयेत. कारण या संकल्पनांचा अधिकाधिक विकास करणे आणि काळानुसार त्याचे महत्व वाढवण्याचे काम अनुयायांना आणि अभ्यासकांना करायचे असते. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पना आणि मूल्यांचा अधिकाधिक प्रचार, प्रसार करण्याचे काम होत राहिले. यावरून त्यांचा इतिहासावर प्रभाव असल्याचे स्पष्ट होतेच. शिवाय समाजमनावरही त्यांचा विशेष ठसा उमटल्याचे सिध्द होते. आज बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्यानिमित्ताने केवळ त्यांच्या चळवळींचा जरी अभ्यास केला तरी या महापुरुषाने इतिहासाचा कितीतरी मोठा कायापालट आपल्या कवेत घेतल्याचे जाणवत राहाते. वयाच्या २६ व्या वर्षी त्यांनी कोलंबिया विद्यापीठात भारतीय जाती व्यवस्थेवरचा जो पहिला निबंध वाचला त्यात व्यक्त केलेले विचार आणि आजच्या विसाव्या शतकातील जाती व्यवस्थेची परिस्थिती यासंदर्भात बाबासाहेबांचा व्यापक दृष्टीकोन लक्षात येतो. भारतीय समाजव्यवस्थेतील जाती संस्था ही जगातल्या अन्य देशांपेक्षा कशी वेगळ्या स्वरुपाची आहे आणि त्याचे निर्मूलन करणे कसे शक्य आहे हेसुध्दा बाबासाहेबांनी अगदी तरुण वयातच स्पष्ट करून दाखवले होते. आज अशा या थोर विचारवंताला आणि युगपुरुषाला संपूर्ण देश अभिवादन करीत आहे. मात्र जातीव्यवस्था ही व्यक्तीगत पातळीवर काही प्रमाणात शिल्लक असली तरी समाज व्यवस्थेतला जातीसंस्थेचा प्रभाव नाहीसा झालेला आपण पाहातो आणि याचे सगळे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच जाते.

## माणूस हाच केंद्रबिंदू

जगातील अनेक तत्वज्ञ किंवा सामाजिक क्रांती करणाऱ्यांचा बाबासाहेबांनी अभ्यास केला होता. बाबासाहेबांना सामाजिक पुनर्रचना घडवून आणायची होती आणि याकरिता विषमता, दारिद्र्य आणि अनीती यांचा नाश करायचा होता. त्याठिकाणी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची प्रतिष्ठापना करायची होती. कार्ल मार्क्स यांनी एका ठिकाणी असे म्हटले होते की इतिहास काहीच करत नसतो. त्याच्याकडे भरपूर धनही नसते तो लढायाही करत नसतो. हे सर्व माणूस करीत असतो. खरा जीवंत माणूसच सारे मिळवतो आणि संघर्ष करतो. बाबासाहेबांच्या सामाजिक पुनर्रचनेच्या चळवळीचा अभ्यास केला तर कार्ल मार्क्सचे हे विधान बऱ्याच अंशी सत्य असल्याचे लक्षात येते. बाबासाहेबांनी माणूस हाच मुख्य घटक मानला आणि त्याच्याचसाठी आणि त्याच्याच करवी त्याने संघर्ष घडवून आणला. अर्थातच त्यांचा संघर्ष हा विचाराधिष्ठित होता. त्याला एका फार मोठ्या अभ्यासाची आणि सत्यनिष्ठेची जोड असल्याने तशा प्रकारचे यशही मिळत गेले. किंवा बाबासाहेब आपल्या तत्वविचारांमुळे होणारा विरोध परतवू शकले असे म्हणायला हरकत नाही. काळामध्ये एका प्रखर विचारांचा हा तेजस्वी सूर्य तळपत होता त्यावेळी सावरकर. महात्मा गांधी हे महापुरुषही आपापल्या विचारांमधून समाजाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न करत होते. परंतु त्यांच्या आणि बाबासाहेबांच्या भूमिकेमध्ये एक महत्त्वाचा फरक असा होता की हे नेते तुम्ही काय केले पाहिजे. हे जनतेला सांगत असत तर बाबासाहेब आम्ही काय करावे असे आत्मतेजाचे भान आपल्या अनुयायांना देत असत. दुःख, दुर्दैव आणि दैन्य याचे चटके प्रत्यक्ष बाबासाहेबांनी अनुभवले होते. तसाच लाखोंचा जनसमुदाय त्याच दुष्टचक्रामध्ये भरडला जात होता. आत्मोध्दार ज्याचा त्याने करायचा आहे असा महामंत्र बाबासाहेबांनी समाजाला दिला. त्यांनी आपल्या अनुयायांना स्वाभिमान , स्वावलंबन स्वउध्दार अशी त्रिसूत्रीच आचरणात आणण्याचा आग्रह धरलेला दिसून येतो.

## नैतिक अधिष्ठान दिले

कार्ल मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे त्या त्या काळातला माणूस हाच इतिहासाचेही कारण बनत असतो. फक्त त्या माणसाला योग्य ते नेतृत्व हवे असते. भारतामध्ये माणुसकीच्या या गुणांचे संवर्धन करण्याचे काम बाबासाहेबांनी केले. आणि म्हणूनच समाजाने त्यांचे नेतृत्व स्वीकारले. ही सगळी वस्तुस्थिती त्यावेळच्या अनेक राजकारण्यांना तत्ववेत्त्यांना किंवा अभ्यासकांना प्रखरपणे जाणवली. कारण जगातल्या अनेक चळवळींचा इतिहासही असे सांगतो की, कोणत्याही कार्याच्या मुळाशी सत्य असेल तर त्या कार्याला आपोआप आत्मबलही प्राप्त होते. आणि मग हे सत्य प्राप्त करून घेण्याकरिता धरलेला आग्रह म्हणजेच सत्याग्रह यशस्वी होत असतो. केवळ तात्पुरत्या कारणांसाठी किंवा स्वार्थासाठी उभारलेले कार्य हा दुराग्रह ठरतो तर निष्ठेने अनुयायांच्या आत्मबलावर उभारलेल्या चळवळीला सत्याग्रहाचा नावलौकिकही प्राप्त होतो. ज्याप्रमाणे जगातल्या अनेक महापुरुषांनी आपल्या सामाजिक किंवा राष्ट्रीय कर्तव्यांच्या अग्नीत आपल्या पंचप्राणांची आहुती दिली होती कारण त्यामागे सत्य आणि नैतिक आत्मबळाचे अधिष्ठान होते. बाबासाहेबांनी केलेला सामाजिक अभ्यास हा राष्ट्राच्या संपन्नतेसाठी होता हे लक्षात घेतले पाहिजे आणि म्हणूनच समाजातल्या उणिवांवर त्यांनी विशेष भर दिला. समाज जितका साक्षर होईल तितका त्याला अधिकारही प्राप्त होईल आणि या अधिकारातूनच समता आणि बंधुतेचे तत्व प्रस्थापित करता येईल. त्यांची ही उद्दीष्टे समाजाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करणारी ठरली अशा या तेजस्वी विचारभास्कराला आमचे विनम्र अभिवादन.